## सुविचार

जीवन आपल्याला शिकवत असते की अपयश हे शेवट नसून, नव्या शक्यतांची सुरुवात असते; जिद्द, प्रामाणिकपणा आणि संयम ठेवला तर प्रत्येक अडचण आपल्याला समृद्ध, सक्षम आणि परिपक्व बनवत जाते.

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## ५१ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**नवी दिल्ली** : छत्तीसगडमधील नक्षलविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले असून सुकमा आणि बीजापूर जिल्ह्यांतील ५१ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. या सर्वांवर सुमारे १ कोटी ६१ लाख रुपयांचे बक्षीस होते. या घटनेमुळे बस्तर विभागात शांततेच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकले गेले असल्याचे मानले जाते. यात ३४ महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. हे आत्मसमर्पण जगदलपूर येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या रायपूरमध्ये आगमनाच्या दिवशीच झाले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### केरळमध्ये वाघाची कातडी, नखे, दात जप्त

**कन्नूर (केरळ) :** येथील कथिरूर येथे वन विभागाने सात सदस्यांच्या टोळीचा पर्दाफाश केला आहे आणि वाघाची कातडी, नखे आणि दात जप्त केले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्राथमिक चौकशीनंतर, वन अधिकाऱ्यांना संशय आहे की वाघाची शिकार कर्नाटकात करण्यात आली होती, कारण अटक केलेले लोक तेथे कार्यरत असलेल्या शिकारींशी संबंधित असल्याचे त्यांनी सांगितले. वन अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, शुक्रवारी रात्री त्यांना एक टोळी वाघाची कातडी विकण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळाली.

### ऑटोरिक्षा उलटल्याने चार जणांचा मृत्यू

**लखीमपूर खेरी :** दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे येथे ऑटोरिक्षा रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात पडल्याने तीन मुलांसह चार जणांचा मृत्यू झाला. शनिवारी रात्री बसंतपूर गावाजवळ हा अपघात झाला. एक कुटुंब धौरहरा शहरात एका कार्यक्रमात सहभागी होऊन त्यांच्या गावी परतत होते. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्याने, चालक इसराईल याला समोरील कल्व्हर्ट दिसला नाही आणि ऑटोरिक्षा तिच्या रेलिंगला धडकली आणि नंतर खड्ड्यात उलटली.

### कन्हैयालाल हत्या प्रकरणात भाजप कार्यकर्ते

**जयपूर :** काँग्रेसचे अशोक गेहलोत यांनी आरोप केला की राजस्थानातील उदयपूर येथे झालेल्या कन्हैयालाल हत्या प्रकरणातील आरोपी भाजप कार्यकर्ते आहेत आणि दावा केला की हा "ओपन अँड शट" खटला असूनही, पीडितेचे कुटुंब जवळजवळ चार वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. ते म्हणाले की, राजस्थान पोलिसांनी तातडीने कारवाई केली आणि हत्येच्या काही तासांतच हल्लेखोरांना अटक केली होती.

## भारत-अमेरिका मुक्त व्यापार करारामुळे अब्जावधी डॉलरची बाजारपेठ खुली

# भारतीय अर्थव्यवस्थेला नवी गती!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारत–अमेरिका मुक्त व्यापार करारामुळे भारतीय उद्योग, निर्यात आणि गुंतवणुकीसाठी अब्जावधी डॉलरची संधी उपलब्ध होणार असून, पुढील ५–६ वर्षांत द्विपक्षीय व्यापार ५०० अब्ज डॉलर्सपर्यंत नेण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी दिली. या करारात भारताच्या कृषी क्षेत्राच्या हितांचे पूर्ण संरक्षण करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गोयल यांनी सांगितले की, युरोपियन युनियननंतर अमेरिकेसोबत झालेला हा करार भारताच्या जागतिक आर्थिक स्थानाला अधिक बळ देणारा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'राष्ट्र प्रथम' धोरणानुसार कोणत्याही दबावाशिवाय, समानतेच्या आधारावर भारताने आपल्या अटींवर वाटाघाटी केल्या. त्यामुळे हा करार भारत–अमेरिका आर्थिक संबंधांसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. मुक्त व्यापार करारामुळे भारतीय निर्यातदारांना चीन व व्हिएतनामसारख्या प्रतिस्पर्धी देशांच्या तुलनेत मोठा फायदा होणार आहे. अनेक औद्योगिक वस्तू आणि कृषी उत्पादनांवर शून्य किंवा अत्यल्प शुल्क राहणार असल्याने अमेरिकन बाजारात भारतीय वस्तूंची मागणी वाढेल. याचा थेट सकारात्मक परिणाम जीडीपी आणि परकीय चलन साठ्यावर होईल, असा सरकारचा विश्वास आहे.

करारात भारतीय शेतकऱ्यांच्या हितांचे संरक्षण करण्यात आले असून, मांस, कुक्कुटपालन, दुग्धजन्य पदार्थ, तांदूळ, गहू, साखर, मका, बाजरी आणि फळांवर कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही. सफरचंद आयातीसाठी संतुलित कोटा प्रणाली लागू करून हिमाचल प्रदेश आणि काश्मीरमधील शेतकऱ्यांचे हित जपण्यात आले आहे.

कापड, पादत्राणे, चामड्याची उत्पादने, क्रीडासाहित्य यांसारख्या कामगार-केंद्रित क्षेत्रांवरील शुल्क कपातीमुळे एमएसएमई उद्योगांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्मार्टफोन, औषधे, रत्ने-दागिने यांना अमेरिकेत शून्य-शुल्क प्रवेश मिळणार असून निर्यातीला चालना मिळेल.

उच्च तंत्रज्ञान, एआय, क्वांटम संगणन, औषधनिर्मिती आणि विमान उद्योगातही या करारामुळे सहकार्य वाढणार आहे. एकूणच, भारत जागतिक पुरवठा साखळीतील महत्त्वाचा भाग बनत असून, २०४७ पर्यंत ३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था उभारण्याच्या दिशेने हे एक निर्णायक पाऊल असल्याचे गोयल यांनी अधोरेखित केले.

## शेतकरी संघटनांची भारत बंदची हाक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत–अमेरिका प्रस्तावित व्यापार कराराविरोधात देशातील शेतकरी संघटनांनी तीव्र आंदोलनाची भूमिका घेतली असून १२ फेब्रुवारी रोजी 'भारत बंद'ची हाक देण्यात आली आहे. अमेरिकन शेती उत्पादनांवरील आयात शुल्क कमी करणे किंवा पूर्णपणे हटवणे हे भारतीय शेतीसाठी घातक ठरेल, अशी ठाम भूमिका संयुक्त किसान मोर्चा आणि अन्य शेतकरी संघटनांनी मांडली आहे.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, अमेरिकन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या अनुदानामुळे भारतीय शेतकरी त्यांच्या स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. त्यामुळे स्थानिक शेती, उत्पन्न आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. अखिल भारतीय किसान सभेने जारी केलेल्या निवेदनात, भारत–अमेरिका अंतरिम व्यापार कराराला "भारतीय शेतीची अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्यांसमोर शरणागती" असे संबोधले आहे.

या करारामुळे सुक्या धान्याचा चुरा, पशुखाद्यासाठी लाल ज्वारी, सोयाबीन तेल यांसारख्या उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ खुली होईल, असा दावा संघटनांनी केला आहे. याचा थेट फटका दुग्धव्यवसायासह संपूर्ण कृषी क्षेत्राला बसू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. अमेरिका आणि युरोपियन युनियनसारख्या विकसित अर्थव्यवस्थांच्या फायद्यासाठी हे करार केले जात असून भारतासाठी ते तोट्याचे असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. आधीच कमी उत्पन्न, वाढते कर्ज आणि उत्पादन खर्चाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांवर या करारामुळे आणखी संकट येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## परीक्षाकेंद्रावर 'मंगळसूत्र' उतरवलं; हेच का हिंदुत्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर :** आज राज्यभरात शिक्षक पात्रता परीक्षा पार पडत असताना, छ. संभाजीनगरमध्ये संतापजनक प्रकारामुळे गदारोळ पाहायला मिळाला. परीक्षा केंद्रात प्रवेशासाठी महिलांना चक्क त्यांचं 'सौभाग्याचं लेणं' म्हणजेच मंगळसूत्र काढून ठेवण्यास भाग पाडण्यात आलं. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले असून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर टीका केली आहे.

सकाळी ८ वाजेपासूनच शहरातील विविध केंद्रांवर परीक्षार्थींची गर्दी झाली होती. मात्र, आत जाताना मेटल डिटेक्टरचा बहाणा करत महिलांना मंगळसूत्र, कानातले आणि नाकातील दागिने काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनेक विवाहित महिलांनी याला कडाडून विरोध केला. "इतर दागिने ठीक आहेत, पण मंगळसूत्र का?" असा सवाल विचारत महिला विद्यार्थी आक्रमक झाल्या. केंद्राच्या ताठर भूमिकेमुळे महिलांना आपले मंगळसूत्र नातेवाईकांच्या हवाली करावे लागले. अंबादास दानवे यांनी ट्विट करत सरकारचा समाचार घेतला. दानवे म्हणाले की, स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्यांच्या राज्यात महिलांना मंगळसूत्र काढून परीक्षेला बसावे लागते, हे दुर्दैवी आहे. मंगळसूत्र हे सौभाग्याचं प्रतीक आहे. सरकारने ही जाचक नियमावली तात्काळ बदलली पाहिजे. मंगळसूत्र उतरवायला लावणं ही संस्कृती नाही. हिंदू संस्कृतीतील प्रतीकांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही.असे दानवे म्हणाले.

## भाविकांनी सहकार्य करण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांचे आवाहन

# महाशिवरात्रीलाही श्री क्षेत्र भीमाशंकर बंदच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर येथील मंदिर सुरू असलेल्या सभामंडप उभारणी आणि परिसर विकास कामांमुळे यंदाच्या महाशिवरात्रीलाही भाविकांच्या दर्शनासाठी बंदच राहणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर खुले ठेवणे धोकादायक ठरू शकते, त्यामुळे हा निर्णय अपरिहार्य असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले.

नाशिक येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने श्री क्षेत्र भीमाशंकरच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. प्रयागराज महाकुंभच्या अनुभवाच्या आधारे, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक भीमाशंकर येथे दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. दररोज सुमारे एक लाख भाविक येऊ शकतात, हे लक्षात घेऊन प्रशासनाने पायाभूत सुविधा बळकट करण्याचा निर्णय घेतला आहे. या विकास आराखड्यांतर्गत नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग आणि गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम सुरू आहे. जुना सभामंडप अपुरा ठरणार असल्याने तो पूर्णपणे उतरवून नव्याने उभारण्यात येत आहे. सध्या मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर दगडी बांधकाम, जड यंत्रसामग्री आणि साहित्य ठेवण्यात आले असल्याने भाविकांसाठी दर्शन खुले ठेवणे अत्यंत जोखमीचे ठरू शकते. यापूर्वी भाविकांच्या सोयीसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून मंदिर तीन महिने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, कामांची व्याप्ती, वेग आणि सुरक्षिततेच्या बाबींचा सखोल आढावा घेतल्यानंतर महाशिवरात्रीच्या काळातही मंदिर खुले ठेवणे शक्य नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे १२ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी या कालावधीतही मंदिर दर्शनासाठी बंद राहणार आहे. भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असल्याने जून ते सप्टेंबरदरम्यान बांधकाम करणे शक्य होत नाही. त्यामुळे उपलब्ध कालावधीतच कामे पूर्ण करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# प्रयाग येथे अजितदादांचे अस्थिकलश विसर्जन

## त्रिवेणी संगमावर जय पवार यांच्या हस्ते विधीवत भावपूर्ण निरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**प्रयागराज (उत्तरप्रदेश) :** उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे गंगा–यमुना–सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर दिवंगत अजितदादा पवार यांच्या अस्थींचे परंपरेनुसार विधीवत व आदरपूर्वक विसर्जन करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रवादी परिवारातर्फे काश्मीर ते कन्याकुमारी अशी काढण्यात आलेली स्व. अजितदादा पवार यांची देशव्यापी 'अस्थि-कलश यात्रा' विधीवतरीत्या पूर्णत्वास गेली. हरिद्वार येथून प्रारंभ झालेल्या या राष्ट्रव्यापी यात्रेचा समारोप प्रयागराजच्या त्रिवेणी संगमावर भावनिक वातावरणात पार पडला.

याप्रसंगी अजितदादा यांचे धाकटे चिरंजीव, युवानेते जय पवार हे कुटुंबीयांसह प्रयागराज येथे उपस्थित होते. अस्थि-कलशाचे पूजन करण्यात आल्यानंतर संगमाच्या व्हीआयपी घाटावर अस्थी संगमात प्रवाहित करण्यात आल्या. राष्ट्रवादी युवकचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी परिवाराच्या वतीने अस्थिविसर्जन सोहळा पार पडला. राष्ट्रीय सचिव धनंजय शर्मा, उत्तरप्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हरिश्चंद्र सिंग, उत्तरप्रदेशातील भाजपचे प्रमुख नेते, तसेच राष्ट्रवादीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर?

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा विधान परिषदेचा कार्यकाळ लवकरच संपणार आहे. उद्धव ठाकरे यांचा विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा कार्यकाळ हा १३ मे रोजी संपणार आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर जाणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात होऊ लागली आहे. उद्धव ठाकरे यांच्यासह विधान परिषदेतील ९ आमदारांचा कार्यकाळ हा लवकरच संपणार आहे. त्यामुळे विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. आघाडीकडे पुरेसे संख्याबळ नसल्याने त्यांची कोंडी होणार आहे. संख्याबळाच्या कमतरतेमुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी विधान परिषदेची निवडणूक जिंकणे हे मोठे आव्हान असणार आहे.

## राज्यभरात लालपरीची चाके थांबणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भत्ता प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने कर्मचा-यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. याबाबत आता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांच्या मासिक भत्त्याबाबत राज्य सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही, तर एसटी बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यभरात पुन्हा एकदा एसटी बंद करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे.

केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार राज्य सरकारच्या अर्थ विभागाने ११ डिसेंबर १९९८ रोजी एसटी महामंडळातील आगारांची शहरनिहाय अ १, अ, ब १, ब २ अशी वर्गवारी केली. त्यानुसार एसटी महामंडळाच्या कर्मचा-यांना शहराच्या श्रेणी आणि वर्गनिहाय मासिक वेतनानुसार मासिक पूरक भत्ता ठरवून दिला आहे. मात्र, अनेक शहरांतील कर्मचा-यांना नियमाप्रमाणे मासिक भत्ता दिला जात नसून, याबाबत वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही याबाबत योग्य निर्णय न घेतल्यास राज्यात एसटी बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य एसटी कामगार संघटनेचे सचिव दिलीप परब यांनी दिला आहे.

दरम्यान, एसटी कर्मचा-यांच्या संघटनेकडून त्यासाठी सरकारला ३ दिवसांचा वेळ दिला आहे. यावर राज्य सरकारकडून काय निर्णय घेतला जाणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. अन्यथा एसटी बंद राहिल्यास प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता आहे. मागण्या मान्य न झाल्यास एसटी बंद करण्याचा इशारा कर्मचारी संघटनेने दिला आहे. एसटी कर्मचा-यांच्या संघटनेकडून त्यासाठी सरकारला ३ दिवसांचा वेळ दिला आहे. राज्यभरातील एसटी कर्मचारी संघटनांनी संप पुकारल्यास 'महाराष्ट्र बंद'सारखी स्थिती होऊ शकते. सरकारकडून यावर काय निर्णय घेतला जाणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## ११४ राफेल विमानांच्या खरेदीची तयारी; चीन-पाकिस्तानची चिंता वाढणार

# भारताच्या हवाई ताकदीत पडणार मोठी भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारतीय वायुसेनेची ताकद अधिक भक्कम करण्यासाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलण्याची तयारी केली आहे. ११४ राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीचा प्रस्ताव लवकरच अंतिम टप्प्यात जाण्याची शक्यता असून, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रों यांच्या भारत दौऱ्यापूर्वीच संरक्षण अधिग्रहण परिषद या प्रस्तावाला मंजुरी देऊ शकते. या प्रकल्पाची एकूण किंमत सुमारे ३.२५ लाख कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

सूत्रांनुसार, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत ११४ राफेल विमानांच्या खरेदीवर शिक्कामोर्तब होऊ शकते. त्यानंतर मॅक्रों यांच्या भारत दौऱ्यादरम्यान या कराराला अंतिम स्वरूप दिले जाण्याची शक्यता आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने संरक्षण सज्जतेला गती दिली असून, हवाई दलाच्या आधुनिकीकरणावर विशेष भर देण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत १८ विमाने 'फ्लाय-अवे' स्थितीत खरेदी केली जाणार असून, उर्वरित विमानांचे उत्पादन देशातच केले जाणार आहे. एकूण खरेदीपैकी ६० ते ८० टक्के विमाने भारतात निर्मित होण्याची शक्यता आहे. या अंतर्गत ८८ सिंगल-सीटर आणि २६ ट्विन-सीटर राफेल विमानांचा समावेश असेल. फ्रेंच कंपनी दसॉ एव्हिएशन आणि भारतीय खासगी कंपन्यांच्या सहकार्याने ही निर्मिती होणार आहे. मागील महिन्यात या प्रकल्पाला संरक्षण खरेदी बोर्डाची मंजुरी मिळाली असून, आता पुढील टप्प्यातील औपचारिक चर्चा सुरू होणार आहेत.

चालू आर्थिक वर्षात संरक्षण मंत्रालयासाठी ७.८५ लाख कोटी रुपये इतका तरतूद करण्यात आली असून, तो मागील वर्षापेक्षा सुमारे १५ टक्क्यांनी अधिक आहे. या बजेटमधून आधुनिकीकरण, आकस्मिक परिस्थितीला तोंड देण्यासाठीची तयारी आणि संशोधन-विकासावर भर देण्यात आला आहे. संरक्षणासाठीची तरतूद एकूण जीडीपीच्या १.९९ टक्के आहे. तज्ज्ञांच्या मते, पाकिस्तान-बांगलादेशमधील वाढती जवळीक आणि चीनची आक्रमक भूमिका लक्षात घेता भारताने संरक्षण क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली आहे. ही डील पूर्ण झाल्यास भारताकडे एकूण १७६ राफेल विमाने असतील. आधुनिकीकरणासाठी १.८५ लाख कोटी, पेन्शनसाठी १.७१ लाख कोटी आणि संशोधन-विकासासाठी १७,२५० कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. या सर्व घडामोडींमुळे भारताची हवाई क्षमता लक्षणीयरीत्या वाढणार असून, प्रादेशिक संतुलनावर त्याचा ठसा उमटण्याची शक्यता आहे.

## भाजपचे नेतृत्व मान्य आहे का? सुनील शेळकेंचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनाला ११ दिवस उलटले असले, तरी त्यांच्या नावाभोवतीचे राजकीय वादळ अद्याप शांत झालेले नाही. अपघातासंदर्भातील चर्चांपासून ते राष्ट्रवादी काँग्रेसमधील संभाव्य विलिनीकरणापर्यंत दावे-प्रतिदावे सुरू असतानाच, मावळचे आमदार आणि अजित पवारांचे कट्टर समर्थक सुनील शेळके यांनी शरद पवार गटाच्या भूमिकेवर थेट आणि जाहीर प्रश्न उपस्थित केल्याने राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

शेळके यांनी, "शरद पवार यांच्या पक्षाला विलिनीकरणाची एवढी घाई का आहे?" असा थेट सवाल उपस्थित केला. "यामागे नेमके काय कारण आहे, याचा खोलात जाऊन विचार करावा लागेल," असे सांगत त्यांनी संशय व्यक्त केला. तसेच, जर विलिनीकरणाचा विचार होत असेल, तर शरद पवार गटाला भाजपचे नेतृत्व आणि भाजपचे विचार मान्य आहेत का, याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, असे आव्हानही त्यांनी दिले.

शेळके यांनी स्पष्ट केले की, अजित पवार यांच्या पक्षातील प्रमुख नेत्यांशी विलिनीकरणाबाबत कोणतीही अधिकृत चर्चा झालेली नाही. "अजितदादांच्या कुटुंबात किंवा शरद पवार गटातील काही नेत्यांशी चर्चा झाली असेल, तर ते नाकारता येणार नाही. मात्र, त्या चर्चांवरील अंतिम निर्णयाचा अधिकार अजित पवार यांच्याकडेच होता," असे ते म्हणाले.

## संपादकीय

# मैत्रीचे सूर आणि वास्तवाचे गणित




**भारत–मलेशिया शिखर भेटीतून पुन्हा एकदा मैत्री, विशेष संबंध आणि सहकार्याची भाषा ऐकू आली. पण या शब्दांच्या आड दडलेली धोरणात्मक गणिते, परस्पर मर्यादा आणि अपेक्षांची दरी समजून घेतली नाही, तर ही मैत्री औपचारिकतेपुरतीच राहण्याचा धोका कायम आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यातील चर्चेने द्विपक्षीय संबंधांना नवे शब्द मिळाले, नवी आश्वासने मिळाली; मात्र नवे वळण मिळाले का, हा प्रश्न उरतो. संरक्षण, सुरक्षा, व्यापार, सेमीकंडक्टर, इंडो-पॅसिफिक अशा सर्वच आघाड्यांवर सहकार्य वाढवण्याचा संकल्प जाहीर झाला. हे ऐकायला आशादायी असले, तरी भारताच्या परराष्ट्र धोरणात अशा घोषणा नवीन नाहीत. मलेशिया हा भारतासाठी महत्त्वाचा देश आहे, याबद्दल दुमत नाही. आग्नेय आशियातील त्याचे स्थान, सागरी मार्गांवरील नियंत्रण, तसेच मोठ्या प्रमाणातील भारतीय वंशाची लोकसंख्या यामुळे तो भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचा स्वाभाविक भाग ठरतो. त्यामुळे 'सागरी शेजारी' आणि 'शतकानुशतकेचे संबंध' यांचा उल्लेख होणे अपेक्षितच. प्रश्न इतकाच की, या ऐतिहासिक बंधांचे रूपांतर आजच्या कठोर भू-राजकीय वास्तवात कसे होते? दहशतवादाबाबत पंतप्रधान मोदींनी मांडलेली भूमिका ठाम आहे आणि ती दुहेरी मानके नाहीत, तडजोड नाही. हे विधान देशांतर्गत राजकारणात जितके प्रभावी वाटते, तितकेच ते आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतागुंतीचे ठरते. मलेशिया दहशतवादाच्या विरोधात आहे, हे मान्य; पण त्यांची परराष्ट्र भूमिका अनेकदा इस्लामी जगताशी संतुलन राखण्याची राहिली आहे. त्यामुळे भारताला अपेक्षित असलेले स्पष्ट आणि निर्भेळ समर्थन प्रत्यक्ष कृतीत कितपत उतरते, याबाबत सावध राहावे लागते. संरक्षण आणि सागरी सुरक्षेतील सहकार्य हा या भेटीचा महत्त्वाचा मुद्दा मानला जातो. मलक्का सामुद्रधुनीसारख्या संवेदनशील भागात स्थैर्य राखणे हे भारत आणि मलेशिया दोघांच्याही हिताचे आहे. मात्र, अशा सहकार्याचा अनुभव सांगतो की, संयुक्त सराव, माहितीची देवाणघेवाण आणि औपचारिक करार यांपलीकडे फारसे काही घडत नाही. मोठ्या रणनीती जाहीर होतात, पण त्यांची अंमलबजावणी हळूहळू विसरली जाते. सेमीकंडक्टर आणि डिजिटल तंत्रज्ञानातील सहकार्याची घोषणा मात्र काळाच्या गरजेशी सुसंगत आहे. भारताला उत्पादन केंद्र म्हणून उभे करण्याचे स्वप्न आहे, तर मलेशियाकडे या क्षेत्रातील अनुभव आहे. ही जोडी जमू शकते, पण त्यासाठी धोरणात्मक सातत्य, गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण आणि निर्णयक्षमता लागते. अन्यथा, हे सहकार्यही 'भविष्यातील शक्यता' म्हणूनच नोंदले जाईल. व्यापाराच्या बाबतीतही चित्र मिश्र आहे. दोन्ही देश व्यापार वाढवण्याची भाषा करतात, पण वास्तवात अनेक अडथळे आहेत. शुल्क, नियम, बाजारपेठेतील मर्यादा आणि स्थानिक उद्योगांचे राजकारण यामुळे व्यापार अपेक्षित वेगाने वाढत नाही. मलेशियाने भारताच्या आर्थिक वाढीचे कौतुक करणे ही शिष्टाचाराची बाब असली, तरी त्या कौतुकाचे रूपांतर प्रत्यक्ष गुंतवणुकीत होते का, हा खरा मुद्दा आहे. इंडो-पॅसिफिक संदर्भात भारताची भूमिका स्पष्ट आहे, तो म्हणजे विकास, शांतता आणि स्थिरता. मात्र, ही संकल्पना केवळ आदर्शवादी नाही, तर चीनच्या वाढत्या प्रभावाला तोल देण्याचा प्रयत्नही आहे. मलेशिया या बाबतीत अत्यंत सावध आहे. चीनशी त्यांचे आर्थिक संबंध खोलवर रुजलेले आहेत. त्यामुळे भारताच्या अपेक्षांनुसार मलेशिया ठामपणे एका बाजूला उभा राहील, अशी अपेक्षा वास्तववादी ठरणार नाही. भारतीय वंशाच्या लोकसंख्येचा उल्लेख करून सांस्कृतिक नात्यांची आठवण करून देण्यात आली. हे नाते नक्कीच महत्त्वाचे आहे, पण त्याचा वापर केवळ भावनिक पातळीवर न करता, शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी होतो का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. परदेशातील भारतीय समुदाय हा केवळ अभिमानाचा विषय नसून, जबाबदारीचाही विषय आहे. एकूणच, भारत–मलेशिया शिखर भेटीतून मैत्रीचे सूर अधिक ठळक झाले. पण परराष्ट्र धोरण केवळ शब्दांवर चालत नाही. त्याला वास्तवाची धार, निर्णयांची स्पष्टता आणि अंमलबजावणीची ताकद लागते. 'विशेष संबंध' ही संज्ञा तेव्हाच खरी ठरेल, जेव्हा या भेटीचे परिणाम कागदावर नव्हे, तर जमिनीवर दिसतील. अन्यथा, हा दौरा देखील औपचारिकतेत अडकलेली आणखी एक राजनैतिक नोंद ठरेल.न

# करवाटपाचे गणित आणि संघराज्याची नवी कसोटी

**» सोळाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी स्वीकारत केंद्राने राज्यांचा करहिस्सा कायम ठेवला असला, तरी वाटपाच्या सूत्रांतील बदलांनी जुन्या वादांना नव्याने धार दिली आहे. समता, कामगिरी आणि वित्तीय शिस्त यांतील संतुलन आज भारतीय संघराज्याच्या केंद्रस्थानी उभे आहे.**



१ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करताना सोळाव्या वित्त आयोगाचा अहवाल संसदेसमोर मांडला गेला आणि त्यास तात्काळ मान्यता दिल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले. वरवर पाहता हा निर्णय सातत्याचा वाटतो. राज्यांचा करवाटपातील हिस्सा ४१ टक्के कायम ठेवण्यात आला आहे. मात्र तपशीलात पाहिल्यास, या आयोगाने केवळ आकड्यांची नव्हे, तर संघराज्याच्या तत्त्वांचीही पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला आहे. हाच मुद्दा या अहवालाला राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा बनवतो. भारताची राजकोषीय संघराज्यीय रचना ही संविधानाची देण आहे. कर गोळा करण्याचे अधिकार मोठ्या प्रमाणावर केंद्राकडे असताना, खर्चाच्या जबाबदाऱ्या राज्यांवर अधिक आहेत. या विसंगतीतून निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी वित्त आयोग ही यंत्रणा उभी करण्यात आली. हस्तांतरणे ही केंद्राच्या दयाळूपणावर न राहता, घटनात्मक चौकटीत आणि तज्ज्ञांच्या शिफारशींवर आधारित असावीत, ही त्यामागची भूमिका होती. म्हणूनच वित्त आयोग हा केवळ आर्थिक नव्हे, तर राजकीय स्थैर्य राखणारा संस्थात्मक दुवा मानला जातो. सोळाव्या आयोगाने या परंपरेशी फारकत घेतलेली नाही, पण तिची व्याप्ती बदलली आहे. अरविंद पनगढिया यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने 'क्षैतिज सूत्र' नव्याने मांडले. २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येला अधिक वजन देण्यात आले, तर राष्ट्रीय जीडीपीतील योगदान हा नवा निकष जोडण्यात आला. या बदलांमुळे समानीकरण आणि कामगिरी यांतील जुना तणाव पुन्हा उफाळून आला आहे. उत्तर भारतातील मोठी, तुलनेने गरीब राज्ये आणि दक्षिण व पश्चिमेतील आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्ये यांच्यातील मतभेद यामुळे अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. गरीब आणि मागास राज्यांना अधिक संसाधने देणे हा संघराज्याचा नैतिक आधार आहे. पण त्याच वेळी आर्थिक शिस्त, करसंकलनातील प्रयत्न आणि विकासासाठी घेतलेली जोखीम यांना मान्यता मिळावी, अशी अपेक्षाही काही राज्यांची आहे. सोळाव्या आयोगाने जीडीपीतील योगदानाला स्थान देऊन या अपेक्षेला प्रतिसाद दिला आहे. मात्र यामुळे 'आम्ही अधिक भरतो, पण आम्हालाच कमी मिळते' ही भावना बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वाटपाचा प्रश्न केवळ किती टक्के मिळाले, यापुरता मर्यादित नाही. काय वाटपातून वगळले जाते, हाही तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे. उपकर आणि अधिभार हे आज केंद्राच्या महसुलातील मोठे साधन बनले आहे. संविधानानुसार हे कर विभाज्य पूलच्या बाहेर ठेवले गेले असल्याने त्यांचा लाभ राज्यांना मिळत नाही. जीएसटीमुळे अनेक राज्यांचे स्वतंत्र कराधिकार मर्यादित झाले असताना, केंद्राने उपकरांवर अधिक अवलंबून राहणे हे वित्तीय केंद्रीकरणाकडे नेणारे आहे, अशी टीका दीर्घकाळ होत आहे. सोळाव्या आयोगाने या प्रश्नावर ठोस तोडगा दिलेला नाही, ही त्याची मोठी मर्यादा ठरते. वित्त आयोगाच्या वाटप प्रक्रियेत दोन टप्पे असतात: उभे आणि आडवे. उभ्या वाटपात केंद्र आणि राज्यांमधील हिस्सा ठरतो; आडव्या वाटपात राज्यांमध्ये विभागणी होते.

या दुसऱ्या टप्प्यातील निकषांची संख्या आणि वजन वाढत चालले आहे. लोकसंख्या, उत्पन्नातील अंतर, क्षेत्रफळ, वनक्षेत्र, लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी, करप्रयत्न आणि आता आर्थिक योगदान—या साऱ्यांचा मेळ घालणे हे अवघड गणित आहे. प्रत्येक नव्या निकषासोबत कुणाचा तरी फायदा होतो, तर कुणाचा तोटा. त्यामुळे वित्त आयोगाचा अहवाल हा तांत्रिक दस्तऐवज न राहता, राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरतो. या सगळ्या प्रक्रियेत एक मोठा बदल सूचित होतो: पात्रतेवर आधारित हस्तांतरणाऐवजी कामगिरी आणि अनुपालनावर आधारित संघराज्यवाद. वित्तीय शिस्त राखणाऱ्या, सुधारणा करणाऱ्या राज्यांना प्रोत्साहन देण्याची ही भूमिका तत्त्वतः योग्य वाटते. पण भारतासारख्या असमान देशात, जिथे प्रारंभिक स्थितीच वेगवेगळी आहे, तिथे कामगिरीची मोजपट्टी काळजीपूर्वक वापरावी लागते.

अन्यथा संघराज्यीय ऐक्याला धक्का लागू शकतो. सोळावा वित्त आयोग सातत्य आणि बदल यांचा संगम दर्शवतो. त्याने मूलभूत चौकट जपली आहे, पण प्राधान्यक्रम बदलले आहेत. हा बदल भारताच्या आर्थिक प्रवासाशी सुसंगत आहे, पण त्याचे सामाजिक आणि राजकीय परिणाम दुर्लक्षित करता येणार नाहीत. संघराज्य हे केवळ करवाटपाचे सूत्र नसून, परस्पर विश्वासाचे नाते आहे. त्या नात्यातील ताण वाढू न देता, समता आणि कार्यक्षमता यांचा समतोल राखणे हीच या आयोगाच्या शिफारशींची खरी कसोटी ठरणार आहे.

# स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा हा नागरिकांचा हक्क

## महापौर रवि लांडगे यांची निगडी-चिखली जलशुद्धीकरण केंद्रांना पाहणी

- भामा-आसखेड प्रकल्पासह पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर
- शहराच्या वाढत्या मागणीचा घेतला सविस्तर आढावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा अधिक सक्षम ठेवण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी निगडी व चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रांना भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली.

या वेळी शहराच्या एकूण पाण्याच्या गरजा, सध्याची पुरवठा व्यवस्था आणि भविष्यातील उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

चिखली परिसरासाठी निगोजे बंधाऱ्यातून दररोज ९० एमएलडी पाणी घेतले जाते, तर भामा-आसखेड धरणातून २०० एमएलडी क्षमतेचा नवीन प्रकल्प उभारणीच्या प्रक्रियेत आहे. निगडी सेक्टर-२३ येथील केंद्र सध्या ५५० एमएलडी क्षमतेने कार्यरत असून शहरातील सुमारे ७५ टक्के क्षेत्राला पाणीपुरवठा केला जात आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. नागरिकांना नियमित, दर्जेदार व पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यावर भर देण्याचे महापौरांनी सांगितले.

# पुणे पालिका पदाधिकाऱ्यांसाठी कोट्यवधींच्या आलिशान गाड्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** सुमारे चार वर्षांनंतर पुणे महापालिकेचे सभागृह पुन्हा लोकप्रतिनिधींनी गजबजणार असून सोमवारी (दि. ९ फेब्रुवारी) महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर नव्या पदाधिकाऱ्यांच्या स्वागताची तयारी सुरू असताना महापालिका प्रशासनाने त्यांच्यासाठी अद्ययावत आणि आलिशान वाहनांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. या खरेदीसाठी सुमारे सव्वा पाच कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते तसेच विविध समित्यांच्या अध्यक्षांसह एकूण २८ वाहनांची खरेदी प्रस्तावित असून याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर पुढील पंधरा दिवसांत ही वाहने महापालिकेच्या ताब्यात दाखल होण्याची शक्यता आहे. शहराचे प्रथम नागरिक असलेल्या महापौरांसाठी 'इनोव्हा हायक्रॉस' या एसयूव्ही प्रकारातील आलिशान वाहनाची निवड करण्यात आली असून त्यासाठी सुमारे २५.४१ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. विरोधी पक्षनेते व शहर सुधारणा समिती अध्यक्षांसाठी 'मारुती व्हिक्टोरिअस' या मध्यम आकाराच्या एसयूव्ही गाड्या देण्यात येणार आहेत. याशिवाय इतर समिती अध्यक्षांनाही तितक्याच अद्ययावत गाड्या देण्याचा निर्णय आहे. २०१७ नंतर वापरात असलेली पदाधिकाऱ्यांची वाहने जुनी व अनुपयोगी झाल्याने नवीन वाहन खरेदीची गरज प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# गर्लफ्रेंडला भेटायला आला अन् पोलिसांच्या जाळ्यात अडकला मकोका आरोपी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** गेल्या चार महिन्यांपासून पोलिसांना चकवा देत फरार असलेला आणि मकोका अंतर्गत गुन्हा नोंद असलेला कुख्यात आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात आला. आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी गुपचूप वडगाव परिसरात आलेल्या चंद्रशेखर उर्फ शेखर विठोबा ठोंबरे (वय २८, रा. कात्रज) याला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली.

ठोंबरेवर खंडणी, जबरी चोरी, प्राणघातक हल्ला आणि खुनाचा प्रयत्न अशा गंभीर गुन्ह्यांची नोंद असून त्याच्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर तो फरार झाला होता आणि पोलिसांकडून त्याचा शोध सुरू होता. पोलिसांना ठोंबरे वडगाव येथील प्रयेजा सिटी परिसरातील एसआरए इमारतीजवळ आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिसरात सापळा रचला. आरोपी ठरलेल्या ठिकाणी पोहोचताच पोलिसांनी वेढा घालत त्याला शांतपणे ताब्यात घेतले. त्रज परिसरातील सराईत गुन्हेगार म्हणून ओळख असलेल्या ठोंबरेच्या अटकेमुळे संघटित गुन्हेगारीवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या कारवाईमुळे फरार गुन्हेगारांवर पोलिसांची पकड अधिक मजबूत असल्याचा संदेशही गुन्हेगारी जगतात गेला असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# 'विकसित भारत'च्या दिशेने पिंपरी-चिंचवडची नवी विकासयात्रा; सर्वांगीण विकासासाठी महापौर रवि लांडगे कटिबद्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

- मूलभूत सुविधा, डिजिटल प्रशासन आणि नागरिककेंद्री कारभाराला प्राधान्य
- सर्व घटकांना विकासाच्या प्रवाहात सामावून घेण्याचा निर्धार



**पिंपरी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेतून प्रेरणा घेत पिंपरी-चिंचवड शहराला विकसित, स्मार्ट आणि आत्मनिर्भर बनवण्याचा संकल्प नवनिर्वाचित महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केला. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी शहराचा सर्वांगीण, समतोल आणि नागरिककेंद्री विकास हाच आपला प्रमुख प्राधान्यक्रम असल्याचे स्पष्ट केले.

लांडगे म्हणाले, पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते, वाहतूक, आरोग्य, स्वच्छता व शिक्षण या मूलभूत सुविधांना अधिक सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात येतील. डिजिटल प्रशासन, ई-गव्हर्नन्स, पारदर्शक कारभार आणि भ्रष्टाचारमुक्त व्यवस्थेला प्राधान्य दिले जाईल. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन स्मार्ट सिटी उपक्रम, हरित क्षेत्र वाढविणे, नदी स्वच्छता व प्रदूषण नियंत्रणासाठीही विशेष लक्ष दिले जाणार आहे.

औद्योगिक क्षेत्रातील अडचणी, कामगार प्रश्न, झोपडपट्टी पुनर्वसन तसेच दुर्लक्षित भागांचा विकास यावर प्राधान्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. महापौर म्हणून कोणताही पक्षभेद न ठेवता सर्व प्रभागांना समान न्याय देत पारदर्शक व गतिमान प्रशासन देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी संवादाचे मार्ग खुले ठेवून तक्रारींचे वेळेत निवारण व विकासकामांचा दर्जा राखण्यावर भर देण्यात येणार असून सर्वांच्या सहकार्याने शहर अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि विकसित करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू, असा विश्वास महापौरांनी व्यक्त केला.

# पुरंदर विमानतळाची जागा मीच निवड" – साहित्य संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांचा दावा

## मराठी भाषा, मातृभाषेतील शिक्षण व वाचनसंस्कृती जपण्याचे आवाहन; पुणे नगर वाचन मंदिराच्या वर्धापन दिनी विचारमंथन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** सिव्हिल एव्हिएशनच्या उपाध्यक्षपदावर असताना पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळासाठी जागेची निवड आपणच केली, असा दावा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी शनिवारी केला. पुणे नगर वाचन मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

विश्वास पाटील म्हणाले की, पुरंदर परिसरातील नदीकाठची जागा प्रत्यक्ष पाहून तिची माहिती तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली होती. "त्या जागेकडे आकाशातून पाहिल्यास जणू देवानेच विमानतळासाठी तिची निर्मिती केली असावी असे वाटते," असे त्यांनी नमूद केले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनीही या जागेला मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या विधानामुळे पुरंदर विमानतळाच्या निवडीसंदर्भात नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

कार्यक्रमाला पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, कार्यवाह स्वाती ताडफडे तसेच साहित्य, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात गिरीधर साठे यांना वाचन चळवळीतील आदर्श कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रूपाली पाठक यांना आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, तर डॉ. दत्तात्रय डुंबरे यांना संत साहित्य विषयक आदर्श ग्रंथलेखन पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भाषणादरम्यान विश्वास पाटील यांनी मराठी भाषा आणि वाचनसंस्कृतीच्या जतनाबाबत चिंता व्यक्त केली. राज्यकर्ते तसेच मराठी भाषकांच्या दुर्लक्षामुळे मराठीचे नुकसान झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. "झेंडा कोणताही असो, त्याचा दांडा मराठीचाच असायला हवा," असे सांगत त्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी एकजुटीची गरज अधोरेखित केली.

ग्रंथालये ही समाजातील विचार आणि संस्कृती जपणारी केंद्रे असल्याचे सांगत वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी ग्रंथालयांचे जतन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शासनाने या क्षेत्राकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

प्राथमिक शिक्षण मातृभाषेतच मिळाले पाहिजे, असे ठाम मत व्यक्त करत पटसंख्येच्या निकषावर शाळा बंद करण्याच्या निर्णयांवर त्यांनी टीका केली. गेल्या पन्नास वर्षांत मराठी माध्यमातून शिकलेल्या अनेक शास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती मिळवली असल्याचे उदाहरण देत त्यांनी मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

### वाचनसंस्कृती जपण्यासाठी सातत्यपूर्ण उपक्रम

● मराठी भाषा आणि वाचनसंस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी पुणे नगर वाचन मंदिराच्या माध्यमातून सातत्याने विविध उपक्रम राबवले जात असल्याची माहिती संस्थेच्या कार्यवाह स्वाती ताडफडे यांनी दिली. वाचन मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा मांडला. ताडफडे यांनी सांगितले की, संस्थेकडे सध्या सुमारे सहा हजार नियमित वाचकवर्ग असून सव्वा लाखांहून अधिक ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. विविध विषयांवरील पुस्तके, संदर्भग्रंथ, साहित्य आणि संशोधनपर साहित्य यामुळे वाचन मंदिर ज्ञानसंपन्न केंद्र म्हणून ओळखले जाते. विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील वाचक येथे नियमितपणे येत असल्याचे त्यांनी नमूद केले. वाचनसंस्कृती अधिक बळकट करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर संस्थेचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल नोंदणी, ई-कॅटलॉग, ऑनलाईन माहिती सेवा यांसारख्या उपक्रमांमुळे वाचकांना आवश्यक पुस्तके शोधणे व वापरणे अधिक सोपे होत आहे. भविष्यात तंत्रज्ञानाच्या मदतीने वाचनाची सवय नव्या पिढीत रुजवण्यासाठी आणखी उपक्रम हाती घेतले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# वेधशाळा चौकात धावत्या मोटारीला आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वेधशाळा चौक परिसरात शनिवारी रात्री धावत्या मोटारीला अचानक आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने चालक वेळेत वाहनाबाहेर पडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, बारामती येथील नितीन झगडे हे शनिवारी रात्री वेधशाळा चौकातून आपल्या मोटारीने जात होते. त्यावेळी मोटारीच्या पुढील भागातून अचानक मोठ्या प्रमाणात धूर निघू लागला. बाजूने जाणाऱ्या एका वाहनचालकाने त्यांना याची सूचना दिल्यानंतर झगडे यांनी तत्काळ मोटार रस्त्याच्या कडेला थांबवून बाहेर पडले. प्रारंभी स्थानिक नागरिकांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, मात्र काही क्षणांतच आग भडकली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या कसबा पेठ केंद्रातील अधिकारी कमलेश चौधरी, संजय गायकवाड, उबेद शेख, सुमित दळवी, प्रसाद नाणेकर, आतिश नाईकनवरे व मयूर चव्हाण यांनी घटनास्थळी धाव घेत पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळवले.

मोटारीला आग नेमकी कशी लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उन्हाळ्यात इंजिन तापणे किंवा विद्युत यंत्रणेत बिघाड झाल्याने वाहनांना आग लागण्याच्या घटना घडत असल्याने वाहनचालकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चाळकवाडीत महाशिवरात्रीनिमित्त आजपासून अखंड

**पिंपळवंडी :** चाळकवाडी (ता. जुन्नर) येथे महाशिवरात्री महोत्सवानिमित्त सोमवार (दि. ९) पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला. ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या सप्ताहात काकडा, अभिषेक, तुकाराम गाथा, हरिपाठ, कीर्तन, महाप्रसाद व हरिजागर भजन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. विविध कीर्तनकारांची कीर्तने आयोजित करण्यात आली आहेत. महाशिवरात्री दिवशी महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर व दिंडी सोहळा होणार असून १६ रोजी नामदेव महाराज घुले यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल.

### लोणी येथे विधी महाविद्यालय मार्गदर्शन

**लोणी-धामणी :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, पिंपरी-चिंचवड येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिरासाठी विद्यार्थी लोणीतील भैरवनाथ विद्याधाम प्रशाळेत दाखल झाले. यावेळी हर्षसंकल्प युवा प्रतिष्ठानचे संस्थापक प्रा. हर्षल सुतार यांनी "सोशल ॲनिमेशन, समाजसेवा व युवकांची भूमिका" या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. अर्जुन सोमवंशी, प्रा. स्वाती मेहता व विद्यार्थी उपस्थित होते.

### ट्रॅक्टर ट्रॉलीची डीपीला धडक; मोठी दुर्घटना टळली

**मंचर :** कळंब–महाळुंगे रस्त्यावर स्मशानभूमीजवळ शनिवारी दुपारी ट्रॅक्टर ट्रॉलीने महावितरणच्या वीज वितरण डीपीला जोरदार धडक दिली. चालकाचा ताबा सुटल्याने ही घटना घडली. धडकेत वीज खांब वाकले असून डीपीचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने परिसरात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली. घटनेनंतर महावितरण कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन दुरुस्तीची कामे सुरू केली. काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता.

## आंबेगाव तालुक्यात उन्हाचा कडाका ; शेती कामांवर होतोय परिणाम



**भोर :** आंबेगाव तालुक्यात वाढत्या उन्हाच्या कडाक्यात थोरांदळे परिसरातील शेतात कांदा पिकाची खुरपणी करताना महिला मजूर कष्ट करताना दिसत आहेत. डोक्यावर पांढऱ्या टोपी-ओढण्या बांधून त्या उष्णतेपासून बचाव करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तापमान वाढल्याने दुपारच्या वेळेत काम करणे कठीण होत असूनही पिकांची वेळेवर निगा राखण्यासाठी मजूर वर्गाला कडक उन्हातही शेतात राबावे लागत आहे. **(छाया : किशोर खुडे)**

## केसनंदमध्ये बोगस मतदान प्रकरण उघड; सहा जण ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ बनावट आधारकार्ड जप्त; जिल्हा परिषद निवडणुकीत बनावट कागदपत्रांच्या आधारे मतदानाचा प्रयत्न; वाघोली पोलिसांकडून गुन्हा दाखल

**पुणे :** जिल्हा परिषद निवडणुकीदरम्यान केसनंद परिसरातील एका मतदान केंद्रावर बोगस मतदानाचा प्रकार उघडकीस आला असून सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्या ताब्यातून बनावट आधारकार्ड जप्त करण्यात आले असून एका महिलेसह सर्व सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (७ फेब्रुवारी) जिल्हा परिषदेचे मतदान सुरू असताना केसनंद येथील श्री जोगेश्वरी विद्यालयाच्या आवारातील मतदान केंद्रावर ही घटना घडली. या ठिकाणी तीन आरोपींनी मतदान केले होते, तर उर्वरित तिघांची मतदान कर्मचाऱ्यांनी ओळख पडताळणी करताना चौकशी केली. तपासणीदरम्यान त्यांच्या कडे बनावट आधारकार्ड आढळल्याने संशय बळावला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत सहा जणांना ताब्यात घेतले. आरोपी हे बांधकाम मजूर असून सध्या केसनंद परिसरातील एका नियोजित गृहप्रकल्पाच्या आवारात वास्तव्यास असल्याचे समोर आले आहे. यापैकी तीन आरोपी मूळचे उत्तर प्रदेशातील तर उर्वरित तीन आरोपी वाशीम जिल्ह्यातील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी पोलीस हवालदार बाळासाहेब हराळ यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे मतदानाचा प्रयत्न केल्याप्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर करत आहेत.

## लग्नसराईत जागरण–गोंधळी कलाकारांना सुगी ; आंबेगावात परंपरांना नवा उत्साह

### वाघे मंडळी, भराडी–गोंधळींच्या कलेला वाढती मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या लग्नसराईचा हंगाम जोमात सुरू असून या पार्श्वभूमीवर पारंपरिक जागरण करणारे वाघे मंडळी तसेच भराडी–गोंधळी कलाकारांना सुगीचे दिवस आले आहेत. नववधू–वरांच्या कुलदैवताचे पूजन, जागरण–गोंधळ आणि इतर पारंपरिक कुलाचार पूर्ण करण्यासाठी या कलाकारांची मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आहे.

लग्न समारंभात केवळ औपचारिक विधींवर न थांबता अनेक कुटुंबे आजही परंपरेनुसार कुलदैवताची पूजा, ओवी–भजने, देवीचा गोंधळ व जागरण श्रद्धेने आयोजित करतात. त्यामुळे लग्नाआधी किंवा लग्नाच्या दिवशी रात्री या कलाकारांना निमंत्रित केले जाते. सध्या अनेक गोंधळी–भराडी कलाकार एका दिवसात तीन ते चार ठिकाणी जाऊन कार्यक्रम सादर करत असल्याने त्यांना आर्थिक आधार मिळत आहे.

वळती गावातील जालिंदर हटकर आणि बाळू हटकर यांसारख्या प्रसिद्ध गोंधळी–भराडी कलाकारांना पंचक्रोशीतून मोठी मागणी असून त्यांच्या ढोलकीच्या ठेक्यावर सादर होणारे देवीचे जागरण, भारुड आणि गोंधळ पाहण्यासाठी भाविकांची गर्दी होत आहे. त्यांच्या सादरीकरणामुळे लग्नसमारंभाला धार्मिक व सांस्कृतिक रंगत मिळत आहे. कलाकारांच्या मते, आधुनिकतेच्या युगातही अनेक कुटुंबे आपली पारंपरिक प्रथा जपत असल्याने या लोककलेला पुन्हा चांगले दिवस आले आहेत. मात्र वर्षभर काम उपलब्ध नसल्याने लग्नसराईचा हंगामच त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार ठरतो. एकूणच, आंबेगाव तालुक्यातील लग्नसराईमुळे जागरण करणाऱ्या वाघे मंडळी व भराडी–गोंधळी कलाकारांच्या माध्यमातून लोककला, संस्कृती आणि श्रद्धा जपली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## वनहद्दीत ग्लिरीशीडीयाचा बहर; शुभ्र फुलांनी नटला आंबेगावचा परिसर

### वळती–नागापूर–थोरांदळे भागात निसर्गरम्य दृश्य, जैवविविधतेला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती, नागापूर, जवळे, थोरांदळे, खडकी आदी गावांच्या वनहद्दीत सध्या ग्लिरीशीडीयाची झाडे जांभळट-पांढऱ्या शुभ्र फुलांनी बहरली असून संपूर्ण परिसर निसर्गरम्य झाला आहे. घनदाट वनक्षेत्रात उभ्या असलेल्या या झाडांवरील फुलोऱ्यामुळे परिसराचे सौंदर्य खुलून आले असून नागरिकांचे विशेष लक्ष वेधले जात आहे.

ग्लिरीशीडीयाच्या झाडांवर उमललेली शुभ्र, आकर्षक फुले दूरवर दरवळ पसरवत आहेत. स्थानिकांमध्ये या फुलांच्या वासामुळे उंदीर दूर पळतात, अशी समजूत प्रचलित असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये या झाडांना विशेष महत्त्व दिले जाते. वनहद्दीत मोठ्या प्रमाणावर आढळणारी ही झाडे पर्यावरणीय दृष्ट्या उपयुक्त ठरत असल्याचेही जाणकार सांगतात.

फुलोऱ्याच्या काळात परिसरात पक्षी, फुलपाखरे व विविध कीटकांची वर्दळ वाढल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे जैवविविधतेला चालना मिळत असून निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होत आहे. उन्हाळ्याची चाहूल लागलेली असताना या शुभ्र फुलांनी सजलेल्या ग्लिरीशीडीयामुळे वनपरिसराला वेगळेच सौंदर्य लाभले आहे.

वळती, नागापूर व थोरांदळे परिसरातून जाणाऱ्या नागरिकांना हा फुलोरा पाहण्यासाठी क्षणभर थांबावेसे वाटत असून निसर्गप्रेमींसाठी हा देखावा विशेष आकर्षण ठरत आहे.

## जारकरवाडी–पारगाव गटात चौरंगी-तिरंगी लढतीने रंगत; ७३.३८ टक्के मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ प्रा. हर्षल सुतार यांचे सामाजिक भान आणि कायदा-सुव्यवस्थेवर व्याख्यान

**लोणी-धामणी :** अवसरी बुद्रुक जिल्हा परिषद गटातील जारकरवाडी–पारगाव येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत चौरंगी व तिरंगी लढतीमुळे राजकीय वातावरण तापले आहे. जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, शिंदे शिवसेनेचे अरुण गिरे, भाजपचे किरण वाळुंज आणि अपक्ष गणेश काकडे यांच्यात चुरशीची लढत झाली.

जारकरवाडी पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गट)च्या अंकिता अनिल वाळुंज, शिवसेना (ठाकरे)च्या रोहिणी दिलीप वाळुंज, भाजपच्या शैला गणेश भोजने आणि अपक्ष रोहिणी प्रशांत वाळुंज यांच्यात चौरंगी सामना रंगला. समान नावे व वेगवेगळ्या निवडणूक चिन्हांमुळे मतदारांमध्ये काही प्रमाणात गोंधळ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

पारगाव पंचायत समिती गणात राष्ट्रवादी (अजित पवार गट)च्या सुनंदा ढोबळे, राष्ट्रवादी (शरद पवार गट)च्या श्वेता ढोबळे आणि भाजपच्या मुक्ता तानाजी लबडे यांच्यात तिरंगी लढत झाली. या गटात आमदार दिलीप वळसे पाटील यांचा प्रभाव असल्याने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या लढतीकडे लागले आहे.

एकूण ३५,७४६ मतदारांपैकी २६,२३० जणांनी मतदान केले असून ७३.३८ टक्के मतदानाची नोंद झाली. मतांची विभागणी कोणाच्या बाजूने जाते व कोण बाजी मारतो, हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

## इंद्रायणी नदीवरील पुलाच्या दुरुस्तीसाठी वाहतुकीत बदल

### ८ फेब्रुवारी रात्री १० ते ९ फेब्रुवारी मध्यरात्रीपर्यंत मार्ग बंद

+ पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदी नगरपरिषद हद्दीतील इंद्रायणी नदीवरील चाकण चौक ते इंद्रायणी नगर कमान दरम्यानचा पूल खड्ड्यांमुळे दुरवस्थेत गेल्याने त्याच्या तात्काळ डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या दुरुस्ती कामासाठी संबंधित मार्गावरील सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजेपासून ते ९ फेब्रुवारी २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची अधिसूचना पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेचे उपायुक्त विवेक पाटील यांनी जारी केली आहे.



**पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन**

● इंद्रायणी नदीवरील पुलाच्या दुरुस्ती कामामुळे वाहतुकीत बदल करण्यात आला आहे. चाकणकडून आळंदीच्या दिशेने येणारी वाहने आळंदी फाटा किंवा चिंबळी फाटा ऐवजी भारत माता चौक, मोशी, देहू फाटा किंवा भोसरी–मॅगझिन चौक मार्गे वळवण्यात आली आहेत. देहू फाटा व इंद्रायणी नगर कमान येथून नवीन पुलाकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी असून ही वाहतूक मरकळ चौक, वडगाव चौक किंवा बोपदेव चौक मार्गे वळवण्यात येणार आहे.

या संदर्भात आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी वाहतूक पोलिस प्रशासनास प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार वाहनचालकांनी दुरुस्तीच्या कालावधीत पर्यायी मार्गांचा वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन विवेक पाटील आणि माधव खांडेकर यांनी केले आहे.

दरम्यान, चाकणकडून आळंदीच्या दिशेने येणारी वाहने आळंदी फाटा किंवा चिंबळी फाटा मार्गे न येता भारत माता चौक, मोशी, देहू फाटा किंवा भोसरी–मॅगझिन चौक मार्गे वळवण्यात आली आहेत. तसेच देहू फाटा आणि इंद्रायणी नगर कमान येथून नवीन पुलाकडे जाणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी राहणार असून ही वाहतूक मरकळ चौक, वडगाव चौक किंवा बोपदेव चौक मार्गे वळवण्यात येईल.

चाकण चौकाकडून येणाऱ्या वाहनचालकांनी धानोरे फाटा किंवा इंद्रायणी हॉस्पिटल चौकाचा वापर करून पर्यायी मार्गाने प्रवास करावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी माहिती फलक लावण्यात येणार असून वाहनधारकांनी संयम ठेवून वाहतूक व्यवस्थेला सहकार्य करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## चाकण औद्योगिक भागात असुविधा; तरीही मतदान शांततेत



महाळुंगे (ता. खेड) येथील मतदान केंद्रावर झालेली गर्दी.
(छाया : अविनाश दुधवडे, चाकण)

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ सकाळी उत्साह, दुपारनंतर रांगा व यंत्रणेच्या त्रुटींमुळे मतदार नाराज

**चाकण :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी शनिवारी (दि. ७ फेब्रुवारी) चाकण औद्योगिक भागात सकाळपासून मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. मात्र दुपारनंतर अनेक मतदान केंद्रांवर सोयी-सुविधांचा अभाव, अपुऱ्या मतदान यंत्रणा आणि नियोजनातील त्रुटींमुळे मतदारांमध्ये नाराजी व्यक्त झाली. तरीही एकूण मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्याचे प्रशासनाने सांगितले.

नाणेकरवाडी–महाळुंगे जिल्हा परिषद गटातील महाळुंगे गावात सुमारे साडेतीन हजार मतदार असूनही केवळ तीन मतदान यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली. परिणामी मतदान केंद्रावर प्रचंड गर्दी झाली आणि मतदारांना दोन ते तीन तास रांगेत उभे राहावे लागले. काही मतदार कंटाळून मतदान न करताच घरी परतल्याचे चित्र दिसून आले. दुपारच्या सुमारास काही काळ मतदान मशिन बंद पडल्याने गोंधळ उडाला. "वीज नसल्यामुळे मशीन बंद आहेत," असे कारण प्रशासनाकडून देण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला.

खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी आणि शेलपिंपळगाव येथील संवेदनशील केंद्रांवर पोलिसांकडून अरेरावी झाल्याचाही आरोप काही मतदारांनी केला. सकाळी उत्साहात मतदानासाठी आलेल्या नागरिकांमध्ये दुपारनंतर निराशा पसरल्याचे दिसून आले. निवडणूक यंत्रणेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अशा गैरव्यवस्थापनाचा फटका थेट मतदार सहभागावर बसत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. तथापि, काही ठिकाणी असुविधा व तांत्रिक अडचणी असूनही संपूर्ण चाकण औद्योगिक भागात मतदानाची प्रक्रिया शांततेत पार पडली.

## किशोरवयीन मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रम; ३५ शाळांना सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग व डिस्पोजल मशीनचे वाटप

# श्री गाडगे महाराज विद्यालयात स्वच्छता व आरोग्याचा जागर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** श्री गाडगे महाराज विद्यालयात किशोरवयीन मुलींच्या आरोग्य व स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून आणि Ashland, International Speciality Products (India) Private Limited (CSR Initiative) यांच्या सहकार्याने एक स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील पस्तीस शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन तसेच डिस्पोजल मशीन बसविण्यात येणार असून विद्यार्थिनींच्या मासिक पाळीतील स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

या उपक्रमामुळे मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज दूर होऊन विद्यार्थिनींमध्ये वैयक्तिक स्वच्छतेची सवय बळकट होण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमादरम्यान तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्य, मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता आणि स्वसंरक्षण या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि स्वतःच्या आरोग्याबाबत जबाबदारीची भावना निर्माण झाल्याचे शिक्षकांनी सांगितले.

यावेळी पर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिनचे वितरण तसेच "कळी उमलताना" या मार्गदर्शक पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. त्यामुळे आरोग्यविषयक जाणीवेसोबतच पर्यावरण संवर्धनाबाबतही विद्यार्थिनींमध्ये सजगता वाढण्यास मदत होणार आहे. ओतूर, बल्लाळवाडी, मढ, पिंपळगाव जोगा, पिंपरी पेंढार, वडगाव आनंद यासह एकूण ३५ शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

शाळेच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याचे सांगत विद्यालयाच्या वतीने डिसेंट फाउंडेशन आणि Ashland, International Speciality Products (India) Private Limited यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमास जुन्नर पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अशोक लांडे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, प्रा. एकनाथ डोंगरे, संचालक आदिनाथ चव्हाण, शिरीष डुंबरे, डॉ. पुष्पलता शिंदे, परिचारिका उज्वला गवळी, छाया पाटील, शोभा तांबे तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे रा. ज्ञा. डुंबरे, महादेव ओतूरकर, भिवाजी माळवे, शंकर भिसे, महाजन आदी मान्यवर, शिक्षक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### चेन्नई विमानतळावरील विमान सेवा पूर्ववत

**चेन्नई :** धुक्यामुळे कमी दृश्यमानतेमुळे आंतरराष्ट्रीय सेवेसह काही उड्डाणे जवळच्या विमानतळांवर वळवण्यात आल्यानंतर रविवारी विमानतळाचे कामकाज सामान्य झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. रविवारी सकाळी शहर विमानतळावर मध्यम ते दाट धुके असल्याचे वृत्त आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच, काही उड्डाणांना किरकोळ विलंब झाला. चेन्नई विमानतळाने दिलेल्या माहितीनुसार, विमान वाहतूक सामान्य झाली आहे आणि सर्व उड्डाणे वेळापत्रकानुसार सुरू आहेत.




### मॉलमध्ये गोळीबार: ३ तरुणांना अटक

**यमुनानगर (हरियाणा):** येथील एका खाजगी रुग्णालयाच्या स्वागत क्षेत्रात आणि एका शॉपिंग मॉलच्या बाहेर गोळीबार केल्याच्या आरोपाखाली पोलिस चकमकीनंतर तीन तरुणांना अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, असे त्यांनी सांगितले. शनिवारी रात्री हा गोळीबार झाला. आरोपींना भीती निर्माण करायची होती, असे पोलिस सूत्रांनी सांगितले. तथापि, खंडणीच्या दृष्टिकोनातूनही तपास केला जात आहे.

### अभिनेते सुनील थापा यांचे निधन

**नवी दिल्ली :** "द फॅमिली मॅन" आणि "मेरी कोम" या हिट मालिकांमध्ये काम करणारे ज्येष्ठ नेपाळी अभिनेते सुनील थापा यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी निधन झाले. नेपाळी वृत्तपत्र द काठमांडू पोस्टनुसार, थापा शंखमुल येथील त्यांच्या अपार्टमेंटमध्ये बेशुद्ध अवस्थेत आढळल्यानंतर त्यांना राजधानी काठमांडूमधील थापाथली येथील नॉर्विक रुग्णालयात तातडीने नेण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, डॉक्टरांना हृदयविकाराचा झटका आल्याचा संशय होता.

## अनेक सामाजिक कार्यक्रमासाठी फक्त ४० टक्केच खर्च

# महत्त्वाच्या सरकारी योजनांचा वेग मंदावला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** चालू आर्थिक वर्षात केंद्र सरकारच्या काही सर्वात महत्त्वाच्या आणि व्यापक योजनांवर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्याचे चित्र समोर आले आहे. आरोग्य, सामाजिक सुरक्षा, शिक्षण आणि रोजगाराशी संबंधित योजनांवर बजेटच्या सरासरी केवळ ४० टक्के निधीच खर्च झाल्याची माहिती उपलब्ध आकडेवारीतून पुढे आली आहे.




केंद्र व राज्य सरकारांच्या संयुक्त सहभागातून राबवण्यात येणाऱ्या सुमारे ५०० कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय तरतुदी असलेल्या काही प्रमुख योजनांवर खर्चाचा वेग अत्यंत संथ राहिला आहे. यामध्ये आरोग्य व कुटुंब कल्याण विभागांतर्गत पायाभूत सुविधा सुधारणा, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना, तसेच अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना यांचा समावेश आहे. याचबरोबर मनरेगा आणि अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना यांवरही फक्त ४० टक्केच खर्च झाला आहे.

एकूण ५३ केंद्रीय योजनांचा आढावा घेतला असता, त्यापैकी ६ योजनांवर ४० टक्क्यांपेक्षा कमी, तर ४ योजनांवर ४० ते ५० टक्के खर्च झाला आहे. १५ योजनांवर ५१ ते ७५ टक्के, १० योजनांवर ९० ते १०० टक्के, तर केवळ ६ योजनांवर १०० टक्के पूर्ण खर्च करण्यात आला आहे. उर्वरित ४७ योजनांसाठी सुधारित अंदाज हा मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेसाठी मंजूर करण्यात आलेल्या ८५० कोटी रुपयांपैकी केवळ १५० कोटी रुपयेच खर्च झाले आहेत. एकूण ५३ योजनांसाठी ५ लाख कोटी रुपयांचे बजेट जाहीर करण्यात आले होते. मात्र, ३१ डिसेंबरपर्यंत फक्त २ लाख कोटी रुपये, म्हणजेच ४१.२ टक्के निधीच खर्च करण्यात आला.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, पाणी व्यवस्थापन, पीएम ई-बस सेवा, धरती आबा जनजाति ग्राम उत्कर्ष अभियान, जल जीवन अभियान, प्राथमिक कृषी पतसंस्थांचे संगणकीकरण अशा अनेक योजनांवरही खर्च ४० टक्क्यांपुरताच मर्यादित राहिला आहे. यापैकी सहा योजनांना तर केवळ १० टक्के निधीच मिळाला आहे.

दरम्यान, अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी जल जीवन मिशन (जेजेएम) संदर्भात सकारात्मक माहिती दिली. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत देशातील १६ कोटी घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. ही योजना २०२८ पर्यंत वाढवण्यात आली असून, आणखी ४ ते ५ कोटी घरांना नळपाणी देण्याचे उद्दिष्ट आहे.

पाटील यांनी स्पष्ट केले की, जेजेएमसाठी ६७,३०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या योजनेमुळे देशातील सुमारे ९ कोटी माता-भगिनींचा अंदाजे ४.५ कोटी तासांचा वेळ वाचला आहे. तसेच २४ लाख ८० हजार महिलांना पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले असून, ८ लाख महिलांनी चाचणी अहवाल पोर्टलवर अपलोड केले आहेत.

एकीकडे जल जीवन मिशनसारख्या योजनांची अंमलबजावणी प्रगतीपथावर असल्याचा दावा केला जात असताना, दुसरीकडे अनेक सामाजिक आणि कल्याणकारी योजनांवरील अपुरा खर्च प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे ठरले आहे.

## एनडीए केरळमध्ये सरकार स्थापन करेल: नितीन नवीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**थ्रिसूर :** २०२६ मध्ये होणाऱ्या केरळ विधानसभा निवडणुकीनंतर भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी राज्यात सरकार स्थापन करेल, असा ठाम दावा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी शनिवारी केला. केरळमधील जनतेचा भाजपवरील विश्वास सातत्याने वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

थ्रिसूर येथे 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ आणि विकसित केरळ' या विषयावर आयोजित बुद्धिजीवी मेळाव्यात ते बोलत होते. केंद्र सरकारने केरळसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली असून, राज्याला मिळणाऱ्या कर्जामध्ये २३ टक्के वाढ झाली आहे, तर केंद्राच्या अनुदानात दुप्पट वाढ करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. केंद्र सरकारने केरळकडे कधीही दुजाभावाने पाहिले नाही, याचे हे स्पष्ट पुरावे असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प केरळच्या गरजा आणि आकांक्षांशी सुसंगत असून, पर्यटन, दुर्मिळ खनिजांचा कॉरिडॉर, उच्च-मूल्य पिके आणि उद्योग क्षेत्रात नव्या संधी निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सलग सत्तेत असलेल्या एलडीएफ आणि यूडीएफ सरकारांमुळे केरळचा विकास ठप्प झाला असून, राज्याला आता संरचनात्मक बदल आणि दूरदृष्टीच्या नेतृत्वाची गरज आहे, अशी टीका नवीन यांनी केली. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए महिला, तरुण, शेतकरी आणि उद्योजकांना सक्षम करून 'विकसित केरळ' घडवण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## पाकव्याप्त काश्मीर भारतामध्ये!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिका यांनी अंतरिम व्यापार करारासाठी शनिवारी एक आराखडा जाहीर केल्यानंतर अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयाने ऑनलाईन प्रसिद्ध केलेल्या एका नकाशाने जगाचे लक्ष वेधून घेतले.

या नकाशात संपूर्ण जम्मू-काश्मीर प्रदेश त्यात पाकव्याप्त काश्मीर याचाही समावेश भारताचा भाग म्हणून दाखवण्यात आला असून, चीनकडून दावा करण्यात येणारा अक्साई चीन हाही भारताचा भाग दर्शवण्यात आला आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याची भूमिका भारताने नेहमीच मांडली असली, तरी हा नकाशा अमेरिकेच्या आधीच्या नकाशांपेक्षा वेगळा आहे. यापूर्वी अमेरिकेच्या नकाशांमध्ये हा वादग्रस्त प्रदेश म्हणून दाखवला जात असे. त्यामुळे हा नवा नकाशा वॉशिंग्टनच्या दृष्टिकोनातील सूक्ष्म; पण महत्त्वपूर्ण बदल म्हणून पाहिला जात आहे. या पावलाची वेळही महत्त्वाची मानली जात आहे. कारण, तणावपूर्ण काळानंतर भारत आणि अमेरिका द्विपक्षीय संबंध नव्याने मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत. याआधी ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयात शुल्क लावले होते, जे अमेरिकेच्या मित्रदेशांमध्ये सर्वाधिक होते. मात्र, या अंतरिम व्यापार आराखड्याअंतर्गत हे शुल्क आता १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले असून, कोणत्याही आशियाई देशासाठी हे सर्वात कमी आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे अक्साई चीनचा भारताचा भाग म्हणून करण्यात आलेला समावेश. भारताच्या आक्षेपांनंतरही चीन या प्रदेशावर सातत्याने दावा करत आला आहे. जम्मू-काश्मीर आणि अरुणाचल प्रदेशासह भारताच्या सीमांचे चुकीचे चित्रण केल्याबद्दल परदेशी सरकारे आणि जागतिक संस्थांकडे भारताने वारंवार चिंता व्यक्त केली आहे.

## भारत-मलेशिया व्यापार संबंधांना नवी गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**क्वालालंपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात झालेल्या विस्तृत चर्चेनंतर भारत आणि मलेशियाने संरक्षण व सुरक्षा, सेमीकंडक्टर आणि व्यापार या महत्त्वाच्या क्षेत्रांतील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी अनेक नव्या उपक्रमांना सुरुवात केली आहे. बैठकीनंतर संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना पंतप्रधान मोदी यांनी भारत-मलेशिया संबंधांना "विशेष आणि विश्वासाचे" असे संबोधले.



दहशतवादाविरोधातील भारताची ठाम भूमिका अधोरेखित करताना मोदी म्हणाले, "दहशतवादाच्या बाबतीत आमचा संदेश स्पष्ट आहे—दुहेरी मानके नाहीत, तडजोड नाही." दोन्ही देश दहशतवादविरोधी उपाययोजना, गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि सागरी सुरक्षेत सहकार्य वाढवण्यावर एकमताने सहमत झाले आहेत.

पंतप्रधान मोदी शनिवारी क्वालालंपूर येथे दाखल झाले. विमानतळावर स्वतः पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी त्यांचे स्वागत केले. रविवारी सकाळी पेरदाना पुत्र येथे त्यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. या भेटीमुळे द्विपक्षीय संबंधांना नवी ऊर्जा मिळाल्याचे मानले जात आहे.

मोदी म्हणाले, "भारत आणि मलेशिया हे सागरी शेजारी आहेत. शतकानुशतके आमच्या लोकांमध्ये खोल, प्रेमळ आणि सांस्कृतिक नाते आहे." त्यांनी मलेशियामधील भारतीय वंशाच्या लोकसंख्येचा उल्लेख करत सांगितले की, आज मलेशियामध्ये जगातील दुसऱ्या क्रमांकाची भारतीय वंशाची लोकसंख्या राहते. सांस्कृतिक वारसा, लोकशाही मूल्ये आणि परस्पर आदर हे दोन्ही देशांना जोडणारे घटक असल्याचे त्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, आरोग्य आणि अन्नसुरक्षा या क्षेत्रांत भागीदारी आणखी विस्तारली जाईल, असे सांगून इंडो-पॅसिफिक संदर्भात ते म्हणाले, इंडो-पॅसिफिक प्रदेश हा जगाच्या विकासाचे नवे इंजिन बनत आहे. भारत आणि आसियान देश संपूर्ण प्रदेशात शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी एकत्र काम करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## मुलींनी दुर्लक्ष केल्यास 'गिफ्ट डीड' होणार रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरू :** ज्येष्ठ नागरिकांनी विश्वासाने दिलेली मालमत्ता ही केवळ कायदेशीर कागदपत्र नसून एक नैतिक ट्रस्ट असते, असे ठाम मत नोंदवत कर्नाटक उच्च न्यायालयाने एका ८४ वर्षीय वडिलांच्या बाजूने ऐतिहासिक निर्णय दिला आहे. मुलींनी अन्न, निवारा आणि मूलभूत गरजांपासून वंचित ठेवल्यामुळे, वडिलांनी दिलेला २ एकर जमिनीचा गिफ्ट डीड न्यायालयाने रद्दबातल ठरवला आहे.

न्यायमूर्ती सूरज गोविंदराज यांच्या खंडपीठाने २ फेब्रुवारी रोजी दिलेल्या आदेशात स्पष्ट केले की, पालकांनी मुलांना दिलेली मालमत्ता ही विश्वासावर आधारित असते. तो विश्वास तुटल्यास कायदा मूक प्रेक्षक राहू शकत नाही. अशा प्रकरणात हे कृत्य 'रचनात्मक फसवणूक' ठरते, असेही न्यायालयाने नमूद केले. तुमाकुरू तालुक्यातील रहिवासी वेंकटैया यांनी २०२३ मध्ये त्यांच्या दोन मुलींना वृद्धापकाळात देखभाल करण्याच्या अपेक्षेने २ एकरांहून अधिक जमीन भेट म्हणून दिली होती. मात्र मालमत्ता हस्तांतरित होताच मुलींनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. यानंतर वेंकटैयांनी पालक आणि ज्येष्ठ नागरिकांचे देखभाल व कल्याण कायदा, २००७ अंतर्गत अर्ज केला होता. मात्र 'देखभाल'ची लेखी अट नाही, या तांत्रिक कारणावर स्थानिक अधिकाऱ्यांनी अर्ज फेटाळला होता. हा युक्तिवाद फेटाळून लावत न्यायालयाने म्हटले की, ग्रामीण भारतात विशेषतः ज्येष्ठ नागरिक कायदेशीर बारकाव्यांपेक्षा विश्वास आणि नैतिक अपेक्षांवर अवलंबून असतात. प्रत्येक भेटपत्रात लेखी अट अनिवार्य करणे म्हणजे कायद्याचा मूळ उद्देशच मारून टाकणे ठरेल, असे म्हटले. मृत मुलीचा मुलगा नरसेगौडा याने मालमत्तेवर दावा केला होता. मात्र कोणतीही जबाबदारी न पार पाडता केवळ वारसाहक्काचा दावा करणे म्हणजे कायद्याचा गैरवापर असल्याचे सांगत न्यायालयाने तो फेटाळून लावला.

### ८,५०५ अधिकारी देण्याची तयारी; आयोगाच्या आरोपांना प्रत्युत्तर

## एसआयआरला बंगालचे सहकार्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेबाबत राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यातील वाद अधिक तीव्र झाला असतानाच, बंगाल सरकारने ८,५०५ गट 'ब' अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. हे अधिकारी किंवा त्यांच्याकडे असलेली साधनसामग्री एसआयआर प्रक्रियेसाठी वापरता येईल, असे राज्य सरकारने निवडणूक आयोगाला कळवले आहे.



हा दावा निवडणूक आयोगाच्या भूमिकेच्या थेट विरोधात आहे. आयोगाच्यावतीने ४ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करताना वरिष्ठ वकील राकेश द्विवेदी यांनी सांगितले होते की, पश्चिम बंगाल सरकारने एसआयआर प्रक्रियेवर देखरेखीसाठी केवळ ८० ग्रेड-२ अधिकाऱ्यांच्या सेवा दिल्या आहेत. तसेच, या कामासाठी प्रामुख्याने अंगणवाडी सेविकांसारख्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा वापर करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला होता.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगाचे आरोप फेटाळून लावले असून, आयोगाने जे काही मागितले ते सर्व राज्य सरकारने पुरवले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

बंगालमधील एसआयआर प्रक्रिया लोकशाहीसाठी धोकादायक ठरत असल्याचा आरोप करत, "राज्याला मुद्दाम लक्ष्य केले जात असून, जनतेवर निवडणूक आयोगाकडून अन्याय केला जात आहे," असे बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात ठामपणे मांडले होते.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सोमवारी या प्रकरणावर सुनावणी होणार आहे. ममता बॅनर्जी स्वतः पुन्हा सर्वोच्च न्यायालयात उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने एसआयआरविरोधातील बॅनर्जी यांच्या याचिकेची दखल घेत, खरे मतदार मतदार यादीतून वगळले जाणार नाहीत, याची खात्री करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत. नावांच्या स्पेलिंगमधील किरकोळ चुका किंवा तांत्रिक विसंगतींवरून नोटिसा देताना बूथस्तरीय अधिकारी आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता दाखवावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. निवडणूक आयोग आणि पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना ९ फेब्रुवारीपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश देण्यात आले असून, या प्रकरणाकडे आता देशभरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## हेरगिरी रोखण्यासाठी डिजिटल नियमावली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ऑनलाइन हेरगिरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने राष्ट्रीय सुरक्षेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेले भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सहकार्याने नवे सॉफ्टवेअर-आधारित सायबर फायरवॉल आणि डिजिटल उपकरणांच्या वापरासाठी एकसमान नियमावली तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.



सूत्रांच्या माहितीनुसार, ही नियमावली लवकरच लागू करण्यात येणार असून ती गुप्तचर संस्था, पोलिस, निमलष्करी दल तसेच इतर संवेदनशील यंत्रणांमध्ये वापरात असलेल्या अधिकृत डिजिटल उपकरणांवर बंधनकारक असेल. यामुळे ऑपरेशनल माहितीची चोरी, अनधिकृत डेटा प्रवेश आणि परदेशी हेरगिरीला आळा घालणे शक्य होणार आहे. या नव्या व्यवस्थेनुसार, संवेदनशील क्षेत्रांत वैयक्तिक मोबाईल, लॅपटॉप आणि इतर गॅझेट्सचा वापर मर्यादित केला जाणार आहे. अधिकृत संवादांसाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येणार असून, डेटा वापर, संदेशवहन आणि फाइल ट्रान्स्फरची नोंद (लॉग) ठेवणे बंधनकारक राहणार आहे. अलीकडच्या काळात तडजोड झालेल्या डिजिटल उपकरणांमधून माहिती बाहेर गेल्याच्या घटनांमुळे ही पावले उचलण्यात आली आहेत.

या योजनेअंतर्गत डिजिटल उपकरणांची केंद्रीकृत खरेदी प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. सॉफ्टवेअर इन्स्टॉलेशन, डेटा साठवण आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीवर कडक नियंत्रण ठेवले जाणार आहे. यामुळे मालवेअर, स्पायवेअर आणि अनधिकृत ॲक्सेसचा धोका कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे संबंधित सूत्रांनी बोलताना सांगितले आहे.

## अल्पवयीन मुलाचे चिमुरडीवर अत्याचार

**लखनौ :** उत्तर प्रदेशातील शामली येथे शनिवारी एका १२ वर्षांच्या मुलाने तीन वर्षांच्या चिमुरडीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पिडितेला ती खेळत असताना टॉफीचे आमिष दाखवून आणले आणि त्यानंतर लैंगिक अत्याचार केला. मुलाला ताब्यात घेऊन बाल न्यायालयात हजर करण्यात आले असून, आरोपीला सुधारगृहात पाठवण्यात आले आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे.

## बांगलादेशी घुसखोरांना ममता बॅनर्जींकडून संरक्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी बांगलादेशी घुसखोरांचे संरक्षण करत असून, याच कारणामुळे त्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला विरोध करत आहेत, असा आरोप भाजप नेते व पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी शनिवारी केला. आगामी विधानसभा निवडणुकीत जनता सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचेल, असा दावाही त्यांनी केला.

पश्चिम बंगालसाठी भाजपचे प्रभारी आणि बिहारचे मंत्री मंगल पांडे यांची भेट घेण्यासाठी पाटणा येथे आले असताना अधिकारी यांनी माध्यमांशी संवाद साधला. ममता बॅनर्जींची भूमिका आता पूर्णपणे उघड झाली असून त्या कथित घुसखोरांना वाचवण्यासाठी मतदार यादीच्या पुनरीक्षण प्रक्रियेला विरोध करत असल्याचा आरोप त्यांनी केला. मतदार यादीत बांगलादेशी घुसखोर, रोहिंग्या आणि मृत मतदारांची नावे ठेवण्याचा प्रयत्न घातक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बंगालमध्ये 'राष्ट्रवादी सरकार' स्थापन होईल, असा विश्वास व्यक्त करताना अधिकारी म्हणाले की, बिहारनंतर आता भाजपचे लक्ष पश्चिम बंगालकडे केंद्रित झाले आहे. "अंग (बिहार) आणि कलिंग (ओडिशा) नंतर आता बंगालची वेळ आहे," असा राजकीय दावा त्यांनी केला.

### अमेरिकी टॅरिफ कराराचा भाग; आयात तात्काळ थांबणार नाही

# भारत रशियन तेलावर अवलंबित्व कमी करणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिकेसोबत झालेल्या टॅरिफ कपात कराराचा भाग म्हणून भारत रशियाकडून कच्च्या तेलाची आयात हळूहळू कमी करण्याच्या दिशेने पावले उचलण्याची शक्यता आहे. मात्र, नायरा एनर्जीसारख्या काही रिफायनरीजकडे पर्यायी पुरवठ्याचे मर्यादित पर्याय असल्याने रशियन तेलाची आयात तात्काळ पूर्णपणे बंद केली जाणार नाही, असे या प्रकरणाशी परिचित सूत्रांनी स्पष्ट केले.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी शुक्रवारी भारतातून होणाऱ्या सर्व आयातींवरील २५ टक्के दंडात्मक



टॅरिफ रद्द करण्याच्या कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. भारताने रशियाकडून तेल खरेदी कमी करण्याचे दिलेले आश्वासन लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, रिफायनरीजना रशियाकडून तेल खरेदी थांबवण्याचे कोणतेही अधिकृत आदेश देण्यात आलेले नाहीत. मात्र, अनौपचारिकरित्या खरेदी कमी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. बहुतेक रिफायनरीज आधीच दिलेल्या ऑर्डर पूर्ण करतील, कारण कच्च्या तेलाच्या खरेदीचे व्यवहार साधारणतः ६ ते ८ आठवडे आधी निश्चित केलेले असतात. त्यानंतर मात्र नवीन करार टाळले जाण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी अमेरिकेने प्रमुख रशियन तेल कंपन्यांवर निर्बंध लादल्यानंतर एचपीसीएल, एमआरपीएल आणि एचपीसीएल-मित्तल एनर्जी यांनी रशियन तेलाची खरेदी बंद केली होती. आता इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी) आणि भारत पेट्रोलियम (बीपीसीएल) देखील टप्प्याटप्प्याने रशियन तेलापासून दूर जाण्याची शक्यता आहे.

देशातील सर्वात मोठी खरेदीदार कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीज पुढील काही आठवड्यांत येणारी सुमारे १.५ लाख बॅरलची शिपमेंट मिळाल्यानंतर रशियन तेलाची खरेदी थांबवू शकते. रोझनेफ्ट आणि लुकोइलवर अमेरिकेचे निर्बंध लागू झाल्यानंतर रिलायन्सने यापूर्वीच नवीन व्यवहार थांबवले होते.

या धोरणाला अपवाद ठरू शकते ती नायरा एनर्जी. रोझनेफ्टचा नायरामध्ये ४९.१३ टक्के हिस्सा असल्याने युरोपियन युनियन आणि ब्रिटनने कंपनीवर निर्बंध घातले आहेत. त्यामुळे इतर आंतरराष्ट्रीय पुरवठादार नायराशी व्यवहार करण्यास अनिच्छुक आहेत. यामुळे नायरा काही प्रमाणात रशियन तेलाची खरेदी सुरू ठेवू शकते. डिसेंबर २०२५ मध्ये अमेरिकन अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत नायराच्या या विशेष स्थितीवर चर्चा झाल्याचेही सूत्रांनी सांगितले.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजांपैकी जवळपास ९० टक्के तेल आयातीवर अवलंबून आहे. युक्रेन युद्धानंतर रशियाकडून सवलतीच्या दरात मिळालेल्या तेलामुळे भारताचे आयात खर्च कमी झाले होते. मात्र, आता भू-राजकीय दबाव आणि पर्यायी पुरवठ्याचे पर्याय लक्षात घेता, भारताची ऊर्जा रणनीती नव्याने आकार घेत असल्याचे चित्र आहे.

### रशियन तेल आयातीत घट

- आकडेवारीनुसार, डिसेंबरमध्ये भारताने रशियाकडून दररोज सरासरी १२ लाख बॅरल तेल आयात केले, जे मे २०२३ मधील २१ लाख बॅरलांच्या उच्चांकापेक्षा बरेच कमी आहे. जानेवारीत ही आयात ११ लाख बॅरलांवर आली असून, पुढील महिन्यांत ती १० लाख बॅरलांपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. अमेरिकेसोबतच्या नव्या करारानंतर ही आयात घटून निम्म्यावर येऊ शकते, असा अंदाज आहे.